महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ८१

Website - https://msbsvet.edu.in Email-msbve.secretary@dvet.gov.in दुरध्वनी क्र. ०८६५५९४४८५१/५२/५३

संलग्नता नूतनीकरण आदेश /२०२५

पत्र क्र. मराकौव्यशिप्रशिमं/का-१/मान्यता/२०२५/ 2233

दिनांक 0 6 OCT 2025

विषय :- प्रशिक्षण वर्ष २०२४-२५ ते २०२६-२०२७ मध्ये मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यासाठी मान्यताप्राप्त संस्थांना संलग्नता नूतनीकरण मान्यता देणेबाबत...

संदर्भ :

१. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दि.२०.०१.२०२२, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक- ९, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१
२. मंडळाचे पत्र क्र. का.क्र.०१/नुतनीकरण/२०२४/१८३ दि. २/२/२०२४
३. मंडळाचे पत्र क्र. मराकौव्यशिप्रशिमं/का-१/मान्यता/२०२४/५३० दि. १२/३/२०२५
४. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाचे पत्र (प्रपत्र अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे)

सहपत्रित "प्रपत्र अ" मध्ये नमुद संस्थांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम संलग्नता नूतनीकरणासाठी प्रस्ताव सादर केला आहे. संस्थानी सादर केलेला प्रस्ताव, नूतनीकरण शुल्क, अनामत रक्कम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांचे निरिक्षण अहवाल व अभिप्राय मंडळस्तरावर तपासण्यात येत आहे. सदर संस्थाना २०२३ - २०२४ प्रशिक्षण वर्षासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. सदर संस्थेने २०२४- २०२५ प्रशिक्षण सत्रासाठी नुतनीकरण प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. तथापि, प्रवेश सत्र २०२५ सुरु असल्याने संस्थाना संलग्नता नूतनीकरण आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. प्राथमिक तपासणीच्या आधारे सहपत्रित "प्रपत्र अ" मध्ये नमुद संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ मध्ये तात्पुरता संलग्नता आदेश निर्गमित करण्यात येत आहे. प्रादेशिक कार्यालय निहाय तात्पुरता संलग्नता नूतनीकरण आदेश सहपत्रित करण्यात येत आहेत. तात्पुरता संलग्नता नूतनीकरण आदेशात नमुद अभ्यासक्रम राबविण्यासाठी तसेच प्रशिक्षणार्थी प्रवेश तात्पुरती संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्यात येत आहे.

१. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मंडळ, संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रादेशिक व जिल्हा कार्यालयांकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
२. मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यासाठी संस्थांना ज्या जागेत मान्यता देण्यात आलेली आहे त्याच जागेत प्रशिक्षण आयोजित करण्यात यावेत. संस्थेच्या निर्धारित जागेत बदल आढळल्यास संस्था मान्यता रद्द करण्यात येईल. संस्थेस जागेत बदल करावयाचा असल्यास मंडळाने निर्धारीत केलेल्या प्रमाणित कार्यपध्दती प्रमाणे मंडळाकडे अर्ज करावा व मंडळाची मान्यताप्राप्त झाल्यावरच संस्था स्थलांतरीत करावी.

Scanned with OKEN Scanner

३. मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांत राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) नुसार बदल केल्यास वा कालानुरुप अभ्यासक्रत अद्यावत केलेल्या त्याप्रमाणे प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन देणे व प्रशिक्षण आयोजित करणे संस्थेवर बंधकारक राहील.

४. संस्थेला मंडळाने मंजूर केलेल्या अभ्यासक्रमाच्या एका तुकडीसाठी ३० प्रशिक्षणार्थी प्रवेश क्षमता आहे.संबंधित अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या शैक्षणिक अहर्तेनुसार व मंजूर प्रवेश क्षमतेपर्यंत प्रशिक्षणार्थी प्रवेश करणे, अभ्यासक्रमासाठी आवश्यक ती यंत्र व साधनसामुग्री उपलब्ध करुन देणे, अभ्यासक्रमासाठी निर्धारित शैक्षणिक व अनुभव अहर्तेचे शिक्षण / शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती करणे व निर्धारित मानकांप्रमाणे प्रशिक्षण आयोजित करणे ही संस्थेची जबाबदारी राहील.

५. संस्थेस मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यास स्वयंअर्थसहाय्यित व कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर तात्पुरती मान्यता देण्यात आलेले आहे. तसेच, मंडळाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अथवा शिक्षण / प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

६. अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपलब्ध अटीं व शर्तीमध्ये किंवा नवीन अटीं व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार मंडळाचे राहतील.

७. सदर संलग्नता नूतनीकरण आदेशाव्दारे प्रशिक्षण वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ मध्ये मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यासाठी मान्यताप्राप्त संस्थांना संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्यात येत आहे. तथापि, या दरम्यान मंडळाव्दारे किंवा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाद्वारे संस्थांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येईल व संस्थेत मानकांप्रमाणे प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नसल्यास संस्थेवर कार्यवाही करण्यात येईल.

८. प्रशिक्षण वर्ष २०२७-३० मध्ये संस्थाना संलग्नता नूतनीकरण करण्यासाठी मंडळाकडे तत्कालिन प्रमाणित कार्यपद्धती व वेळापत्रकाप्रमाणे विहीत मुदतीत अर्ज सादर करावा लागेल. संस्थेने संलग्नता नूतनीकरण मान्यता घेतली नाही तर संस्था प्रशिक्षणार्थी प्रवेश करु शकणार नाही व सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल.

९. संस्थेने प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांची माहिती मंडळाने निर्धारित केलेल्या प्रवेश/ परीक्षा कालबध्द कार्यक्रमानुसार व निर्धारित शुल्कासह सादर करणे बंधनकारक आहे.

१०. संस्थेने संस्थेच्या नावापुढे "__________कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था" तसेच त्याखाली "स्वयंअर्थसहाय्यित व कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर मान्यता मिळालेले प्रमाणपत्र/ पदवीका अभ्यासक्रम" नमूद करून नाम फलक दर्शनी भागात लावावा. तसेच संस्थेच्या नावात अभियांत्रिकी, मेडिकल, तंत्रनिकेतन , कॉलेज, औद्योगिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, भारतीय, महाराष्ट्र या शब्दांचा कोणत्याही भाषेत वापर केल्यास संबंधीत संस्थेवर कार्यवाही करण्यात येईल.

११. संस्थेने नुतनीकरण मान्यता न घेता प्रशिक्षणार्थी प्रवेश केल्यास किंवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश केल्यास असे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही व या प्रशिक्षणार्थ्यांची परीक्षा मंडळाव्दारे घेण्यात येणार नाही. तसेच संबंधीत संस्थेवर "महाराष्ट्र कृषी , पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

१२. प्रशिक्षणार्थी प्रवेश, प्रशिक्षण व परीक्षा वेळापत्रक व कार्यपध्दती तसेच इतर अधिक माहितीसाठी संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, प्रादेशिक कार्यालय, मंडळ व मंडळाचे संकेतस्थळ https://msbsvet.edu.in येथे संपर्क साधावा.

Scanned with OKEN Scanner

१३. सहपत्रित संस्थांना त्यांनी मंडळाकडे केलेला अर्ज, अर्जासोबत सादर केलेले दस्तऐवज व प्रत्यक्ष निरीक्षण या आधारे प्रथम मान्यता व तदनंतर संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्यात आलेली आहे. संस्थानी सादर केलेल्या माहितीत वा प्रत्यक्ष प्रशिक्षण सुविधांमध्ये भविष्यात काही विसंगती/बेकायदेशीर कृती आढळल्यास संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल आणि अशा दोषी संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१४. संस्थेस मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यास स्वयंअर्थसहाय्यित व कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर तात्पुरती मान्यता देण्यात आल्यामुळे सदर संस्थेतील अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा / वेतन व तदनुषंगिक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. मंडळ, शासन वा शासन अधिपत्याखालील कोणत्याही कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

सोबत - प्रपत्र अ

(ज्योती लोहार)
सचिव

प्रत - माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४००००१
२. मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सर्व प्रादेशिक कार्यालये
३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सातारा, जालना, हिंगोली, बीड , यवतमाळ, नागपूर, गोंदिया.
४. संबंधित संस्था (संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या मार्फत)
५. का - ४(क) संगणक विभाग

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र -अ

संलग्नता नुतनीकरण आदेश ०२/२०२५ जावक क्रमांक - 2233 दिनांक :- 06/10/2025

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

सन २०२४-२५ ते २०२६-२७या पुढील ३ वर्षासाठी नुतनीकरण मान्यता

विभाग :- छत्रपती संभाजीनगर

| S.N. | Inward date | Institute Code | Name | Address | District | Primary Mobile Number | Land owned | Rented | Expiry of Lease | S.N. | Course Code | Course Name | Unit | First Approval details | | Previous Affiliation Renewal details | | security deposit details | | Renewal Fees Details | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | Letter no. | date | Letter no. | date | paid amt. | bank | paid amt. | date | |
| 1 | 27.03.2025 | MSB200200 | PANCHASHIL BAHUUDESHIY SEVABHAVI SANSTHA'S HITECH SKILL DEVELOPMENT INSTITUTE | S.NO. 23, GAT NO.61/4, PLOT NO.188 TO191, NANDED ROAD, GANGA NAGAR, A/P KARWADI, TALUKA: HINGOLI, DISTRICT: HINGOLI | HINGOLI | 7972126287 | | YES | 27.04.2031 | 1 | MSBQ408102 | CERTIFICATE COURSE IN COMPUTER TYPING - ENGLISH 30 WPM | 1 | व्हिओसी-2023/प्र.क्र.43/उद्योज कता | 20.09.2023 | | | 10000/- | HDFC | 10000/- | 23.07.2024 | |
| | 27.03.2025 | MSB200200 | PANCHASHIL BAHUUDESHIY SEVABHAVI SANSTHA'S HITECH SKILL DEVELOPMENT INSTITUTE | S.NO. 23, GAT NO.61/4, PLOT NO.188 TO191, NANDED ROAD, GANGA NAGAR, A/P KARWADI, TALUKA: HINGOLI, DISTRICT: HINGOLI | HINGOLI | 7972126287 | | YES | 27.04.2031 | 2 | MSBQ408105 | CERTIFICATE COURSE IN COMPUTER TYPING - MARATHI 30 WPM | 1 | व्हिओसी-2023/प्र.क्र.43/उद्योज कता | 20.09.2023 | | | | | 10000/- | 24.07.2024 | |
| | 27.03.2025 | MSB200200 | PANCHASHIL BAHUUDESHIY SEVABHAVI SANSTHA'S HITECH SKILL DEVELOPMENT INSTITUTE | S.NO. 23, GAT NO.61/4, PLOT NO.188 TO191, NANDED ROAD, GANGA NAGAR, A/P KARWADI, TALUKA: HINGOLI, DISTRICT: HINGOLI | HINGOLI | 7972126287 | | YES | 27.04.2031 | 3 | MSBQ201238 | CERTIFICATE COURSE IN HEALTH SANITARY INSPECTOR | 1 | व्हिओसी-2023/प्र.क्र.45/उद्योज कता | 20.09.2023 | | | | | 10000/- | 11.07.2024 | |
| | 27.03.2025 | MSB200200 | PANCHASHIL BAHUUDESHIY SEVABHAVI SANSTHA'S HITECH SKILL DEVELOPMENT INSTITUTE | S.NO. 23, GAT NO.61/4, PLOT NO.188 TO191, NANDED ROAD, GANGA NAGAR, A/P KARWADI, TALUKA: HINGOLI, DISTRICT: HINGOLI | HINGOLI | 7972126287 | | YES | 27.04.2031 | 4 | MSBQ201404 | DIPLOMA COURSE IN MEDICAL LABORATORY TECHNOLOGY | 1 | व्हिओसी-2023/प्र.क्र.45/उद्योज कता | 20.09.2023 | | | | | 10000/- | 22.07.2024 | |
| 2 | 09.07.2025 | MSB200068 | B. PUSHKAR SHIKSHAN SANSTHA'S B. PUSHKAR SKILL DEVELOPMENT INSTITUTE | S.NO.29/1, PLOT NO. 42B, ANAND NAGAR, BALSOND, TALUKA: HINGOLI, DISTRICT: HINGOLI | HINGOLI | 9822792201 | | yes | 12.03.2034 | 1 | MSBQ201238 | CERTIFICATE COURSE IN HEALTH SANITARY INSPECTOR | 1 | व्हिओसी-2023/प्र.क्र.45/उद्योज कता | 20.09.2023 | | | | | | | |

SECRETARY
Maharashtra State Board of Skill, Vocational Education and Training
Mulund (East), Mumbai-400 081

Scanned with OKEN Scanner